**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

जा.क्र. १७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०४/२०१८

**१) बचत खात्यामधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ०४/०४/२०१८ चे १५.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीला आरोपी मोबाईल धारकाने फिर्यादीचे मोबाईलवर बॅक ऑफ बडोदा बॅकेचे एटीएम चे १६ अंकी नंबर व ओटीपी नंबर विचारून ऑनलाईन बचत खात्यामधुन ३०,०००/रु. काढुन फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी सौ. प्रिती प्यारेलाल गोस्वामी वय ३२ वर्ष रा. भोजापुर हिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(सी) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. सिडाम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) इंटरनेट बॅकिग द्वारे खात्यामधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ०६/०४/२०१८ चे ०७.०० ते ०८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीचे खाता एस.बी.आय शाखा भंडारा संगणकाशी संबधीत आहे. यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या मोबाईलवर ओटीपीचे १५ मॅसेज तसेच थर्ड पार्टी ओटीपीचे मॅसेज पाठवुन इंटरनेट बॅकिंग द्वारे फिर्यादीचे खात्यामधुन ३,७०,००५/रु. डेबीट करून व इतर इलेक्ट्रॉनिक द्वारे फसवणुक केल्याने फिर्यादी संपतवय्य मालाय्य बेल्लम वय ४३ वर्ष रा. सनफ्लॅग कॉलोनी वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(ई), ४३ आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. ढोबळे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) टाटा एस वाहनामध्ये माल भरून अप्रमानिकपणे घेवुन गेल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ०१/०४/२०१८ चे १६.३० ते १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हे मारेगाव भुत कंपनी येथुन त्याच्या गाडीमध्ये एमएमपी पावडरचे एकुण १० पांढ—या रंगाचे डब्बे कि. ८५,१०९/रु. चा माल घेवुन येत असतांना यातील आरोपी यांनी गाडीतील कंपनीच्या माला विषयी विचारना करून हा माल कंपनीला मी घेवुन जानार आहे, असे सांगुन गाडीमध्ये बसला व सदर गाडी ही नटराज हॉटेल बेला येथे आणुन आरोपी व ४ ते ५ इसमांनी टाटा एस गाडीमध्ये माल भरून अप्रमानिकपणे घेवुन गेल्याने फिर्यादी सचिन भिमराव निंबार्ते वय २७ वर्ष रा. मालीपार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९,४०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) नगदी पैसे व चांदीच्या दागीन्याची चोरी :—**

दिंनाक ०५/०४/२०१८ चे २४.०० ते दि. ०६/०४/२०१८ चे ०२.४५ वाजता. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपी इसमाने फिर्यादीचे घराचे मागचे दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून आलमारीतील नगदी २,०००/रु. व आलमारीचे बाजुला भिंतीचे हॅगरला लटकवुन ठेवलेल्या २ फुलपॅन्टच्या खिश्यातुन नगदी ५३,०००/रु. असा एकुण ५५,०००/रु. तसेच गावातील तानबा गोपाल दमाहे यांचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून लोखंडी आलमारीतील नगदी ५,०००/रु. व चांदीच्या पायपट्या व ४ आंगठया वजन ३२० ग्रॅम कि. ६,०००/रु. असा एकुण ११,०००/रु. चा माल दोन्ही मिळुन ६६,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी उदाराम गुलाब माहुर्ले वय ४० वर्ष रा. खमारी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुळे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**५) भांडण करून बैलबंडीचे उभारीने डोक्यावर मारून दुखापत केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ०६/०४/२०१८ चे १०.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हात्याचे पत्नी सौ. उर्मीला कांबळे वय ३० वर्ष हिचे सह बैलबंडीने शेतावर जात असतांना आरोपीचे गव्हाचे चुंगळीला बैलबंडीची खिल्ली लागल्याने चुगंळी फाटली असता यातील आरोपीने झगडा भांडण करून बैलबंडीचे उभारीने फिर्यादीचे डोक्यावर दोन ठिकाणी मारून दुखापत केल्याने व फिर्यादीची पत्नी भांडण सोडविण्यास आली असतांना तिचे उजव्या हाताचे अंगठया जवळ बोटाला चावा घेतल्याने फिर्यादी उत्तम महादेव कांबळे वय ३५ वर्ष रा. सालेबर्डी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) संगमत करून भांडण व मारपीट करून दुखापत केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनाक १०/०३/२०१८ चे १८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा आपला शिवधुरा पेटवीला असता यातील अरोपी क्र. २ याने 'हा आमचा शिवधुरा आहे तो कसा पेटवीला'असे म्हणुन भांडण केले व आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करून फिर्यादीस मारपीट केली व फिर्यादीचा मुलगा विनोद खराबे याच्या नाकावर मारून दुखापत केली व शिवीगाळ केल्याने आज रोजी जखमीचे एक्स—रे रिपोर्ट प्राप्त झाल्याने फिर्यादी भैय्या हुसन खराबे वय ६० वर्ष रा. नवेगाव मलकाझरी यांचे तोंडी व एक्स—रे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२५,३२३,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**७) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक जखमी :—**

दिनाक ११/०३/२०१८ चे १७.०० वाजता. दरम्यान यातील मृतक चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, लापरवाहीने चालवुन समोरून येणारी हिरो होंडा सिडी मोटार सायकल क्र. एमएच ३६ बी ८११२ ला धडक मारून त्यावरील चालक गड्डु पारधी व मागील प्रविण गौतम यांना गंभिररीत्या जखमी करून स्वत: जखमी होवुन मरणास कारणीभुत झाल्याने चौकशी अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी सफौ. सोलंखी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**८) अवैध दारु अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक ०६/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, तुमसर, पवनी, व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी व देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४७ लिटर हातभंट्टी दारू + १६० किलो सडवा+ साहीत्य किमती ११,६५०/रु. व ८१ लिटर देशी दारू + १ माराती व्हॅन किंमती १,१३,४००/—रु. व जुगारातुन १,१८,४१०/रु. असा एकुण २,४३,४६०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०६/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी — ०४ तीन सिटर वाहनाकरीता ०९ ईतर वाहनांवरती — ४८ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता